आर.सी.सी. १६१/२०२४
सरकार वि. दादाभाऊ मुठे
**निशाणी १६**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ३ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – संजय चिंधू भांगरे, वय – ३७ वर्षे,
व्यवसाय – शेती, राहणार – खडकी खु.,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. रंजना ही माझी बहीण आहे. तिचे लग्न आरोपी दादाभाऊ याचेसोबत ३०.०४.१९९९ रोजी झाले होते. तिचे लग्नानंतर तिचे सासरचे लोकांनी तिला ५ वर्ष चांगले नांदवले. पाच वर्षानंतर आरोपी हा माझ्या बहिणीस माहेरकडून वीस हजार रूपये कर्ज फेडण्यासाठी मागू लागला तसेच त्रास देवू लागला. तो माझ्या बहिणीस शिवीगाळ करून त्रास देवू लागला, पैसे नाही आणले तर तुला मारून टाकील असे म्हणत होता. माझ्या बहिणीने आम्हाला घरी येवून याबाबत सांगितले. आम्ही दादाभाऊ यांच्याकडे जावून त्यांना समजावून सांगितले. परंतु, त्याच्यावर काहीच फरक पडला नाही. दादाभाऊ याचे योगिता कचरे हिचेसोबत संबंध जुळले आणि ते पळून गेले. त्यानंतर सासु, सासरे हे माझ्या बहिणीला त्रास देवू लागले. त्यानंतर माझ्या बहिणीने फिर्याद दिली. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. मी आरोपीस ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. बी. व्ही. मोरे यांच्या मार्फत –**

२. हे म्हणणे खरे आहे की, दादाभाऊ याने माझ्या बहिणीकडे पैसे कधी मागितले हे मला सांगता येणार नाही. आरोपीने कर्ज फेडण्यासाठी पैसे मागितले हे बहिणीच्या सांगण्यावरून सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझेसमक्ष पैसे मागितले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की,

**निशाणी १६**

आरोपी दादाभाऊ याने माझे समक्ष माझे बहिणीला शिवीगाळ करून तुला मारून टाकीन अशी धमकी दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही १०–१५ जण जिप करून दादाभाऊच्या घरी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी आमची शाब्दीक बाचाबाची झाली व आम्ही लोकांनी त्यास मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, दादाभाऊ हा आम्हाला घाबरूनच घर सोडून पळून गेला होता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, तो आम्ही जाण्याच्या अगोदरच पळून गेला होता.

३. हे मला सांगता येणार नाही की, योगिता कचरे हिचे माझ्या बहिणीचे लग्न होण्याच्या अगोदरच लग्न झाले होते किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, दादाभाऊ याचे योगिता कचरे हिचेसोबत संबंध जुळले ही माझी ऐकीव माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या बहिणीस माझेसमक्ष कधीही त्रास दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, बहिणीच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.04.18 16:21:02 +0530

दिनांक १८.०४.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.